# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:07.02.2025** **वार:शुक्रवार**

---

1. 'राष्ट्र प्रथम' हे आपल्या सरकारच्या विकासाचं सूत्र असल्याचं पंतप्रधानांचं राज्यसभेत प्रतिपादन
2. भारतीय रिझर्व्ह बँक आज द्वैमासिक पतधोरण जाहीर करणार; रेपोदरात कपातीची अपेक्षा
3. पुणे हे देशाचं संरक्षण उत्पादनाचं केंद्र असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन आणि
4. मर्यादित षटकांच्या पहिल्या क्रिकेट सामन्यात भारताचा इंग्लंडवर विजय; मालिकेत 1-0 अशी आघाडी

**संसद**

सबका साथ, सबका विकास या तत्त्वानुसारच राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं कामकाज सुरू असून 'राष्ट्र प्रथम' हे आपल्या सरकारच्या विकासाचं सूत्र असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर देताना ते काल बोलत होते. राष्ट्रपतींचं अभिभाषण भविष्यासाठी मार्गदर्शक असल्याचं पंतप्रधान म्हणाले. केंद्र सरकारने कौशल्य विकास, आर्थिक समावेशन आणि औद्योगिकीकरणावर लक्ष केंद्रित केल्याचं सांगून पंतप्रधानांनी मुद्रा योजना, गरीबांना आरक्षण, शिक्षण, रोजगार अशा अनेक मुद्यांवर भाष्य केलं. ते म्हणाले....

**पहली बार हमारी सरकार ने एक ऐसा मॉडल दिया और सबका साथ सबका विकास के मंत्र की प्रेरणा से दिया कि हमने सामान्य वर्ग के गरीब को 10% आरक्षण दिया। बिना तनाव के, बिना किसी का छीन करके और जब यह निर्णय किया, तो एससी समुदाय ने भी उसका स्वागत किया, एसटी समुदाय ने भी स्वागत किया, ओबीसी समुदाय ने भी स्वागत किया |**

यानंतर राज्यसभेत धन्यवाद प्रस्ताव संमत करुन कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. त्यापूर्वी काल संसदेच्या दोन्ही सभागृहात कामकाज सुरू झाल्यावर अमेरिकेतून भारतीय नागरिकांना हद्दपार केल्याच्या मुद्यावरून विरोधी पक्षांच्या सदस्यांनी गदारोळ केला. त्यामुळे लोकसभेचं कामकाज तीनदा तहकूब झालं. त्यानंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**जयशंकर**

बेकायदेशीररित्या राहणाऱ्या नागरिकांना हद्दपार करण्याची प्रक्रिया नवीन नसून ही सामान्य प्रक्रिया आहे. आपले नागरिक इतर देशात बेकायदेशीररित्या राहत असतील तर त्यांना परत आणणं हे आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये सामान्यपणे स्वीकारलं गेलेलं तत्त्व आहे, असं परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. अमेरिकेने भारतीय नागरिकांना हद्दपार केल्याच्या मुद्द्याबाबत संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये त्यांनी काल निवेदन दिलं.

**उपराष्ट्रपती**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज कर्नाटकमधील रानेबेन्नूर इथं एक दिवसाच्या दौऱ्यावर आहेत. त्यांच्या हस्ते आज कर्नाटक वैभव या साहित्य आणि सांस्कृतिक महोत्सवाचं उद्घाटन होणार आहे.

**रिझर्व्ह बँक**

भारतीय रिझर्व्ह बँक आज आपले द्वैमासिक पतधोरण जाहीर करणार आहे. रिझर्व्ह बँकेचे नवे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली ही पतधोरण समितीची पहिली बैठक आहे. या पतधोरणात रेपोदरात किमान पाव टक्क्यानं कपात केली जाईल अशी अपेक्षा आहे. जवळपास पाच वर्षांच्या अंतरानंतर व्याजदरात कपात होण्याची अपेक्षा आहे. कोविडची जागतिक साथ आणि त्यानंतरच्या टाळेबंदीनंतर अर्थव्यवस्थेला संकटातून बाहेर काढण्यास मदत करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने मे 2020 मध्ये रेपो दर 40 आधारभूत अंकांनी कमी करून 4 टक्क्यांवर आणला होता.

मे 2022 मध्ये रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर त्यात वाढ करण्यास सुरुवात केली होती, मात्र, मे 2023 मध्ये दरवाढ थांबवण्यात आली. आता आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी रेपोदरात कपात करण्याची गरज असल्याचं अनेक उद्योग आणि व्यवसाय संस्थांनी म्हटलं आहे.

**दिल्ली विधानसभा मतमोजणी**

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या उद्या होणाऱ्या मतमोजणीसाठी सर्व तयारी पूर्ण झाली आहे. मतमोजणी प्रक्रिया सुरळीत आणि निष्पक्षपणे पार पाडण्यासाठी सर्व व्यवस्था करण्यात आली असल्याचं दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकारी आर. ॲलिस वाझ यांनी काल सांगितलं. निवडणूक आयोग आणि पोलिस अधिकाऱ्यांच्या सतत देखरेखीखाली ईव्हीएम स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात आल्या असून, मतमोजणीसाठी दिल्लीतील 11 जिल्ह्यांमध्ये 19 मतमोजणी केंद्रं स्थापन करण्यात आली आहेत. मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहाय्यक, सूक्ष्म निरीक्षक, सांख्यिकी कर्मचारी आणि इतर सहाय्यक कर्मचाऱ्यांसह सुमारे पाच हजार कर्मचारी तैनात करण्यात आले असून, त्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले आहे.

**फडणवीस-पुणे-निबे**

देशाचं डिफेन्स क्लस्टर अर्थात संरक्षण उत्पादनाचं केंद्र महाराष्ट्रात आणि त्यातही पुण्यात आहे, असं प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात केलं. चाकण औद्योगिक क्षेत्रांतर्गत निबे डिफेन्स ॲण्ड एरोस्पेस कंपनीच्या अत्याधुनिक उत्पादन सुविधेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यापूर्वी संपूर्ण संरक्षण उत्पादनांचे आयात करणारा आपला देश आज 25 हजार कोटी रुपयांची निर्यात करत आहे. संरक्षण क्षेत्रात जगातील प्रगत देशांमध्ये आपला समावेश होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मेक इन इंडिया- मेक फॉर वर्ल्ड' ही घोषणा दिल्यानं देशातील नवोन्मेषकांना संधी, व्यासपीठ मिळवून दिली आहे. यात महाराष्ट्रानं आघाडी घेतली आहे. काळाची पावले ओळखून 2017 मध्ये संरक्षण उत्पादन धोरण तयार केलं, असं फडणवीस म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, निबे कंपनीचे अध्यक्ष गणेश निबे यावेळी उपस्थित होते.

**राजनाथ-अमेरिका**

भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल अमेरिकेचे नवे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांच्याशी दोन्ही देशातील संरक्षण सहकार्याबाबत संवाद साधला. राजनाथ सिंह यांनी हेगसेथ यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. अमेरिकेचे संरक्षण सचिव म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल हेगसेथ यांचे त्यांनी अभिनंदन केलं. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संरक्षण भागीदारी आणि संबंध अधिक दृढ करण्यासाठी सहमती व्यक्त केली. तंत्रज्ञान सहकार्य, संरक्षण औद्योगिक पुरवठा साखळींचे एकत्रीकरण, मालवाहतूक, माहितीचं आदानप्रदान आणि संयुक्त लष्करी सराव यावर एकत्र काम करण्याबाबतही सहमती झाली.

**जयशंकर-ग्रीस**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस जयशंकर आणि ग्रीसचे परराष्ट्र व्यवहार मंत्री जॉर्ज गेरापेट्रिटिस यांनी काल नवी दिल्ली येथे द्विपक्षीय बैठक घेतली. यावेळी जयशंकर यांनी भारत-ग्रीस भागीदारीचे महत्त्व अधोरेखित केले. भारताला व्यापार, गुंतवणूक आणि तंत्रज्ञान सहकार्याची अपेक्षा असल्याचं त्यांनी सांगितलं. तर ग्रीसचे परराष्ट्र व्यवहार मंत्री जॉर्ज गेरापेट्रिटिस यांनी ग्रीस पर्यटन,

संस्कृती आणि व्यापारासह सर्व बाबतीत भारताबरोबर द्विपक्षीय संबंध वाढवू इच्छित असल्याचं स्पष्ट केलं. ग्रीस भारताला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे सदस्यत्व मिळण्यासाठी पाठिंबा देण्यास तयार आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**तेंडुलकर-राष्ट्रपती**

दिग्गज क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांनं त्यांच्या कुटुंबीयांसह काल राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी अमृत उद्यानात फेरीही मारली. यानंतर झालेल्या एका संवादात्मक सत्रात, सचिन तेंडुलकरनं त्याच्या क्रिकेटपटू होण्याच्या प्रवासातील अनेक किस्से सांगितले. यावेळी विविध शाळा आणि महाविद्यालयांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येनं उपस्थित होते. यशस्वी होण्यासाठी सांघिक कामगिरी, इतरांची काळजी घेणे, इतरांचं यश साजरे करणे, कठोर परिश्रम करणे, मानसिक आणि शारीरिक खंबीरता विकसित करणं महत्त्वाचं असतं, असंही सचिननं विद्यार्थ्यांना सांगितलं.

**प्रदर्शन**

तीन नवीन फौजदारी कायद्यांविषयी लोकांना माहिती देण्यासाठी प्रयागराजमधील महाकुंभमेळ्यात डिजिटल प्रदर्शन उभारण्यात आलं आहे. भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय दक्षता अधिनियम हे नवीन कायदे आहेत. भारताच्या न्यायव्यवस्थेतील ऐतिहासिक बदलाचे प्रतिनिधित्व करणारे हे नवे तीन कायदे गेल्या वर्षी १ जुलै रोजी देशभरात लागू करण्यात आले होते. काही कलाकार पथनाट्याच्या माध्यमातून लोकांमध्ये त्यांचे हक्क आणि तीन नवीन कायद्यांबद्दल जागरूकता निर्माण करत आहेत.

**क्रिकेट**

इंग्लंडविरुद्धचा मर्यादित षटकांचा पहिला क्रिकेट सामना काल भारतानं चार गडी आणि 68 चेंडू राखून जिंकला. नागपूरच्या विदर्भ क्रिकेट संघटनेच्या मैदानावर झालेल्या या सामन्यात इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, आणि 48 व्या षटकातच सर्व गडी गमावून 248 धावा केल्या. भारतातर्फे हर्षित राणा आणि रविंद्र जडेजा यांनी प्रत्येकी 3 गडी बाद केले. रविंद्र जडेजानं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधे 600 बळींचा टप्पा गाठला. 249 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात अडखळत झाली. मात्र नंतर श्रेयस अय्यर, अक्षर पटेल आणि शुभमन गिल यांनी संयमी खेळी करत भारताचा विजय साकार केला. शुभमन गिल याला सामनावीर घोषित करण्यात आलं. या विजायमुळे तीन सामन्यांच्या या मालिकेत भारताला 1-0 अशी आघाडी मिळाली आहे. मालिकेतला दुसरा सामना येत्या रविवारी कटकमध्ये आणि तिसरा सामना 12 फेब्रुवारीला अहमदाबादमध्ये होणार आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.